**स्पे.मु.क्र. ४०७/२०१५**

श्री. वेणू गोपाळ नायर ....वादी

विरूध्द

श्रीमती. निलिमा दिलीप मनवे व इतर ....प्रतिवादी

## :: निशाणी २३ वर आदेश ::

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. २/१, २/२, २/४, ७ व ८ यांनी दिवाणी प्रक्रिया संहीता क्रम ७ रुल ११(ड) अन्वये वादपत्र फेटाळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जात असे नमूद करण्यात आले आहे की, प्रस्तुत दावा हा वादीने, प्रतिवादी क्र. १ ने दि.३०/१२/१९९७ रोजी त्याच्या लाभात निष्पादीत केलेल्या साठेकरारनाम्याची पुर्तता होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे. साठेकरारनामा निष्पादीत केल्यापासून एक वर्षाच्या आत खरेदीखत करुन घ्यावे अशी अट साठेकरारनामा मध्ये नमुद असतानाही विहित कालावधीत खरेदीखत करण्यात आले नाही. त्यानंतर १८ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर वादी हा त्या साठेकरारनाम्याची पुर्तता करुन मागत आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास भारतीय मुदत अधिनियम मधील तरतुदींचा अवरोध येतो.

३. अर्जात पुढे असे नमुद करण्यात आले की, वादपत्रात दि. ३०/१२/१९९७ रोजी साठेकरार निष्पादीत करण्यापूर्वी दि.१४/०१/१९९७ रोजी वादी क्र. १ च्या लाभात प्रतिवादी क्र. १/१ ते १/३ यांचे वडील नामे अनंत लक्ष्मण तवळे व त्याच्या दोन भावांनी बयाणा पावती करुन दिली होती असे तथ्यकथन करण्यात आलेले आहे. त्या बयाणा पावतीप्रमाणे साठेकरार हा तीन महिन्याचे आत निष्पादीत करण्याचे ठरले होते. परंतु साठेकरार हा अटी व शर्ती प्रमाणे तीन महिन्याचे आत निष्पादीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे साठेकरार व बयाणापावती यातील अटी व शर्तीचे उल्लंघन झालेले आहे. बयाणापावती व

साठेकरारातील  अटी व शर्ती आधारे वेळ हा कराराचा आवश्यक घटक होता. त्यातील अटी व शर्ती अन्वये वादीने साठेकरार व खरेदीखत मुदतीत निष्पादीत करुन न घेतल्यामुळे भारतीय मुदत अधिनियमातील तरतुदीचा अवरोध प्रस्तुत दाव्यास येतो. त्यामुळे वादपत्र फेटाळण्याची विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादींनी केली आहे.

४.  वादीने प्रस्तुत अर्जास नि.२३ वर लेखी उत्तर दाखल केले व अर्जातील तथ्य कथन नाकारले. लेखी उत्तरात त्याने असे नमूद केले आहे की, प्रस्तुत अर्ज हा केवळ प्रकरणात विलंब होण्याकरीता दाखल केला आहे. वाद मिळकत ही दि.३०/१२/१९९७ रोजी नोंदविण्यात आलेल्या करारनाम्याच्या आधारे त्याच्या ताब्यात देण्यात आली आहे. सदर करारनाम्याच्या आधारे वाद मिळकत ही त्याने दि.२२/०३/२००४ रोजी महसूल अधिकार अभिलेखात त्याच्या नावे नोंदवून घेतली. वाद मिळकत ही त्याच्या नावे महसूल अधिकारी अभिलेखात नोंदविण्यात आली असल्यामुळे वाद मिळकतचे खरेदीखत निष्पादीत करण्याचे त्यास ज्ञान नव्हते व तसेच त्यास आवश्यकता वाटली नाही.लेखी उत्तरात त्याने पुढे असे नमूद केले आहे की, दि.३०/१२/१९९७ रोजीचा साठेकरार निष्पादीत होण्यास १८ वर्षे पुर्ण झाली असली तरीही प्रस्तुत दावा हा मुदतबाहय होउ शकत नाही, तसेच त्यास ‘वेळ ही कराराची सार’’ या न्यायतत्वाची बाधा येत नाही. दि.१४/०१/१९९७ रोजीच्या बयाणापावतीत साठेकरार हा तीन महिन्याचे आत निष्पादीत करण्याची जरी अट असली तरीही त्यानंतर दि.३०/१२/१९९७ रोजी नोंदणीकृत साठेकरार हा त्याच्या लाभात नोंदवून देण्यात आला असल्यामुळे बयाणा पावतीतील सदर अट ही कराराचा सार नव्हती. प्रस्तुत दावा हा मुदतीत कशा प्रकारे आहे त्यासंबंधीचे तथ्य कथन वादपत्रात करण्यात आलेले आहे. म्हणून प्रस्तुत अर्ज हा नामंजूर करण्याची विनंती त्याने केलेली आहे.

५.  अर्जातील तथ्य कथन व प्रतिकथन या आधारे प्रस्तुत अर्ज न्यायनिर्णित होण्याकरीता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावर निष्कर्ष कारणमिमांसेसह दिलेले आहेत.

| अनु.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रस्तुत दाव्यास भारतीय मुदत अधिनियमातील तरतूदीचा रोध येत असल्यामुळे वादपत्र फेटाळण्यास पात्र आहे का? | नाही. |
| २ | आदेश काय ? | अर्ज नामंजुर करण्यात आला. |

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क. १ करीता :**

**६.** प्रस्तुत अर्ज, लेखी म्हणणे व बयाणा पावती व साठेकरार यांचे अवलोकन केले. प्रतिवादींचे बाजूने त्यांचे विदयमान वकील श्री. चंपालाल बाबूलाल ओसवाल तर वादीच्या बाजूने वकील श्री. लाड यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांनी वादपत्र फेटाळण्याची विनंती केलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी सर्व प्रथम त्यासंबंधी असलेल्या कायदयातील तरतुदीचा उहापोह करणे आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहीता कम ७ रुल ११ यात कोणकोणत्या कारणास्तव वादपत्र फेटाळण्यात येउ शकते हे नमुद केलेले आहे. कायदयातील संबंधीत तरतुदीचे पुनरावृत्ती या ठिकाणी सोईस्कर होईल. ती खालीलप्रमाणे –

**दिवाणी प्रक्रिया संहीता कम ७ रुल ११ खालीलप्रमाणे–**

अ. जेव्हा त्यातून (वादपत्रातुन) काही वादकारण दिसून येत नसेल;

ब. जो अनुतोष मागितला असेल त्याचे मूल्य कमी दाखविले गेले असेल व न्यायालय निश्चित करील अशा मुदतीच्या आत न्यायालयाने त्याला मुल्यांकनात सुधारणा करण्यास सांगितले असता वादीने तसे करण्यास कसूर केली असेल;

क. मागितलेल्या अनुतोषाचे योग्य मूल्यांकन करण्यात आले असले, तरी वादपत्र अपु-या मूल्याचा मुद्रांक लावलेल्या कागदावर लिहिलेले असेल आणि न्यायालय निश्चित करीत अशा मुदतीत न्यायालयाने त्याला आवश्यक तो मुद्रांकित कागद सादर करण्यास सांगितले असता, वादीने तसे करण्यात कसूर केली असेल;

ड. वादपत्रात केलेल्या निवेदनावरुन दाव्याला एखादया कायद्यानुसार रोध आहे असे दिसत असेल;

इ. ते (वादपत्र) दोन प्रतीत सादर केलेले नसेल;

ई. वादीने नियम ९च्या तरतुदींचे पालन केले नसेल;

दिवाणी प्रक्रिया संहीता क्रम ७ रुल ११ अन्वये वादपत्र फेटाळण्याची विनंती विचारात घेत असताना न्यायालयाने केवळ वादपत्र विचारात घेणे आवश्यक आहे व प्रतिवादपत्र किंवा प्रतिवादी यांनी दाखल केलेला पुरावा त्यासंबंधी विचारात घेता येणार नाही. प्रस्तुत प्रकरणात दाखल करण्यात आलेले वादपत्राचे अवलोकन केले. प्रथमत: त्यातील काही ठळक गोष्टी खालीलप्रमाणे नमुद करणे आवश्यक आहे.

i. प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचे वडील नामे अनंत लक्ष्मण तवळे व त्यांचे इतर दोन भाऊ मोतीराम लक्ष्मण तवळे व शांताराम लक्ष्मण तवळे यांनी वादी क्र. १ च्या हक्कात दि.१४/०१/१९९७ रोजी वाद मिळकत संबंधी बयाणा पावती निष्पादीत करुन दिली होती व वाद मिळकतचा साठे करार नोंदवून देण्याचे ठरले होते.

ii. त्या अनुषंगाने दि. ३०/१२/१९९७ रोजी वादी क्र. १ च्या हक्कात अनंत लक्ष्मण तवळे यांनी नोंदणीकृत साठेकरार निष्पादीत करुन दिला होता व सदर साठेकरारात अनंत लक्ष्मण तवळे यांचे दोन भाऊ साक्षीदार म्हणून हजर होते.

iii. नोंदणीकृत साठेकरारा आधारे वाद मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या ताब्यात देण्यात आली.

iv. वाद मिळकतचे खरेदीखत वादीच्या लाभात नोंदवून देण्यात आले नाही.

७. प्रतिवादींच्या बाजूने असे तथ्य कथन करण्यात आले की, १४/०१/१९९७ रोजीच्या बयाणा पावतीतील अटी व शर्ती प्रमाणे साठेकरार हा तेव्हापासून तीन महिन्याचे आत निष्पादीत करणे आवश्यक होते. परंतू साठेकरार हा दि. ३०/१२/१९९७ रोजी निष्पादीत करुन देण्यात आलेला आहे. तसेच सदर

साठेकरारातील अटी व शर्ती प्रमाणे एक वर्षामध्ये खरेदीखत करुन देण्याचे ठरले होते. परंतु विहित मुदतीत खरेदीखत निष्पादीत करुन देण्यात आले नाही. साठेकरार व बयाणा पावतीतील मुदती संबंधीची अट ही कराराची आवश्यक अट होती. त्यामुळे सदर एक वर्ष पुर्ण झाल्यानंतर तेव्हापासून तीन वर्षाच्या आत सदर साठेकराराची पुर्तता होउन मिळण्यास दावा दाखल करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत दावा हा १८ वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीनंतर दाखल करण्यात आलेला आहे आणि म्हणून भारतीय मुदत अधिनियमातील तरतुदींचा रोध प्रस्तुत दाव्यास येतो. म्हणून त्याने वादपत्र फेटाळण्याची विनंती केलेली आहे. प्रतिवादींच्या बाजूने त्यांच्या तथ्य कथनास पुष्टी देण्याकरीता मनोहर प्रभाकर वि. गोमा नागोजी कांबळे २०१५(४) एम.एल.जे. ६४३ या न्यायनिर्णयाचा आधार घेतला.

८. भारतीय मुदत अधिनियम आर्टिकल ५४ मध्ये करार पुर्ततेचा अनुतोषकरीता दावा दाखल करण्यास मुदत नमुद केलेली आहे. करारात पुर्ततेची तारीख नमूद केली असेल किंवा ज्या ठिकाणी नमुद केली नसेल त्यावेळी प्रतिवादी हा पुर्तता करण्यास नकार देत आहे असे वादीस निदर्शनास आल्यानंतर तीन वर्षाचे आत दावा दाखल करण्यास मुदत नमूद केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात बयाणापावती व साठेकरार प्रतिवादी क्र. १/१ ते १/३ च्या वडीलांनी निष्पादीत करुन दिलेला आहे. साठेकरार हा बयाणा पावती निष्पादीत तारखेपासून तीन महीन्याचे आत निष्पादीत करण्याचे ठरले होते.परंतु साठेकरारनामा हा तीन महिन्यानंतर निष्पादीत करुन देण्यात आलेला आहे. साठेकरार हा तीन महीन्याचे आत निष्पादीत करण्यात आला नसला तरीही त्यानंतर तो निष्पादीत करुन देण्यात आलेला आहे.प्रतिवादी क्र. १/१ ते १/३ चे वडीलांनी विहित मुदतीनंतर साठेकरार निष्पादीत करुन दिलेला आहे. यावरुन बयाणा पावतीत नमुद केलेली वेळ ही कराराची आवश्यक अट नव्हती असे प्रथमदर्शनी दिसून येते. साठेकरार निष्पादीत तारखेपासून एक वर्षाचे आत खरेदीखत करुन घेण्याचे ठरले होते. सदर अट व शर्त ही कराराचा सार आहे किंवा नाही हे ठरविण्याकरीता त्यावर विस्तृत पुराव्याची आवश्यकता आहे आणि केवळ प्रस्तुत अर्जातील प्रतिवादींच्या

तथ्य कथनाआधारे त्यावर निष्कर्ष नोंदविणे योग्य नाही. त्यामुळे प्रकरणाच्या या टप्प्यावर त्यावर निष्कर्ष देणे संयुक्तीक नाही.  प्रतिवादींच्या बाजूने दाखल करण्यात आलेले मनोहर प्रभाकर वि. गोमा नागोजी कांबळे (उपरोक्त नमुद) या न्यायनिवाडयाचे सुक्ष्म अवलोकन केले. मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणात उभयपक्षांनी केलेली करारात “Time is the Essence of Contract” होती असे निरीक्षण करुन दावा मुदतीत नाही असे निरीक्षण केले आहे. परंतु त्या प्रकरणात मुद्दयांची रचना होउन उभयपक्षांच्या बाजूने विस्तृत पुरावा दाखल करण्यात आला होता. त्या पुराव्यांचा उहापोह व अवलोकन करुन मा. उच्च न्यायालय या निष्कर्षावर आले होते की, वेळ ही कराराची सार होती आणि तीचे पालन न केल्यामुळे दावा मुदतीत नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणात मुद्दयांची रचना करण्यात आलेली नाही व उभयपक्षांच्या बाजूने पुरावाही देण्यात आलेला नाही. त्यामुळे त्या अभावी प्रकरणाच्या या टप्प्यावर वेळ ही कराराची सार होती हे ठरविणे संयुक्तीक नाही. सबब  मनोहर प्रभाकर वि. गोमा नागोजी कांबळे (उपरोक्त नमूद) व प्रस्तुत प्रकरणातील तथ्य कथनाशी  सुसंगत नाही. म्हणून सदर न्यायनिवाडा हा प्रतिवादींना प्रकरणाच्या या टप्प्यावर उपयुक्त ठरत नाही.

९.  वादपत्राचे अवलोकन केले असता त्यात दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल येथे दिवाणी दावा क्र. १०३/२०१२ हा प्रतिवादी क्र. ९ ने वादीचे विरुध्द दाखल केला असल्याचे आणि दिवाणी दावा क्र. १३३/२००९ हा प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी वादी विरुध्द कर्जत येथील न्यायालयात प्रस्तुत वाद मिळकत संबंधी दाखल केलेले असल्याचे नमुद केलेले आहे. यासंबंधी प्रतिवादींच्या बाजूने असे तथ्य कथन करण्यात आले की, ज्याअर्थी दिवाणी दावा क्र. १३३/२००९ हा त्यांनी वादी विरुध्द दाखल केला त्याअर्थी सन २००९ मध्येच कराराची पुर्तता करण्यास ते नकार देत आहे हे वादीच्या लक्षात आले आणि तेव्हापासून तरी तीन वर्षाच्या मुदतीत प्रस्तुत दावा दाखल करणे वादीस आवश्यक होते. त्यामुळे प्रस्तुत दावा हा मुदतीत दाखल केलेला नाही असे पुढे त्यांनी तथ्य कथन केले. यासंबंधी वादीच्या बाजूने असे तथ्य कथन करण्यात आले की, दोन्हीही दाव्यात त्यास समन्सची बजावणी झालेली नाही. प्रतिवादींच्या प्रस्तुत अर्जातील तथ्य कथनावरुन हे स्पष्ट

होते की, दोन्हीही दाव्यात वादी हा हजर झालेला नाही. वादीने यासंबंधी असे तथ्य कथन केले की, वाद मिळकतचा त्याच्या नावे असलेला फेर क्र. ८ व १५२ या विरुध्द देण्यात आलेल्या निवाडया विरुध्द त्याने ज्यावेळेस आर.टी.एस. अपिल क्र. २/२०१५ दाखल केले त्यावेळी दस्तऐवजाची पाहणी केली असता त्यास त्याविरुध्द वरील दिवाणी दावे दाखल असल्याचे माहिती झाली. उपरोक्त दोन्हीही दाव्यांची वादी यास आर.टी.एस. अपिल क्र. २/२०१५ दाखल करण्यापुर्वी माहिती होती किंवा नाही हा तथ्य कथनासंबंधी वाद आहे व त्याचे निराकरण विस्तृत पुराव्यानंतर करणे शक्य आहे. म्हणून प्रतिवादींनी यासंबंधी घेतलेला आक्षेप हा प्रकरणाच्या या टप्प्यावर ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे मी या निष्कर्षावर येत आहे की, प्रकरणाच्या या टप्प्यावर प्रस्तुत दाव्यात भारतीय मुदत अधिनियम यातील तरतुदीचा रोध येत आहे हे ठरविणे संयुक्तीक नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ ला नकारार्थी घोषीत करीत आहे.

**मुद्दा क्र. २ करीता :**

**१०.** मुद्दा क्र. १ ला नकारार्थी घोषित केल्याने प्रस्तुत अर्ज हा नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

**१**. प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

पनवेल. (राजेश क. खोमणे)
दिनांक– ०७/०१/२०१६ सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल.